









# कोट्यवधींची संपत्ती वारसांच्या शोधात...

**आपल्या पश्चात आपली संपत्ती आपल्या वारसाला विनासायास मिळावी, यासाठी योग्य ती कायदेशीर प्रक्रिया आपण हयात असताना करणे गरजेचे असते. मात्र, अनेकदा असे नियोजन केले नसल्याने वारसांना किचकट, वेळखाऊ प्रक्रियेतून गेल्यानंतर संपत्ती प्राप्त होते. अनेकदा वारसांना संपत्तीबाबत माहिती नसते किंवा वेळखाऊ प्रक्रियेमुळे ते याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे बँकखाती, शेअर, म्युच्युअल फंड अशा विविध पर्यायांमध्ये विनादावा पडून असलेली संपत्ती लाखो-कोटींच्या घरात आहे. प्रसिद्ध आणि ज्येष्ठ पत्रकार-संपादक सुचेता दलाल यांच्या 'मनीलाइफ फाउंडेशन'ने याबाबत काही उपाययोजना सुचविल्या आहेत.**





**अक्षय नाईक**
Akshay@moneylife.in


**अभय दातार**
a_datar@yahoo.in




एखादी व्यक्ती जेव्हा मृत्यू पावते, तेव्हा तिच्या नावे असलेली संपत्ती नामनिर्देशित व्यक्तीला (nominee) किंवा त्या मृत व्यक्तीने मृत्युपत्र केले असल्यास त्या मृत्युपत्रात निर्देशित केलेल्या व्यक्तीला (legal heir) दिली जाते. त्याचा उल्लेख आपण 'वारस' असा करू या. मात्र, वारसाला त्यासाठी योग्य प्रकारे दावा करावा लागतो. अशी दाव्यांविना (अनक्लेम्ड) पडून राहिलेली अशी रक्कम दोन लाख कोटी रुपयांपेक्षाही जास्ती आहे. बँकांतील मुदत ठेवी, म्युच्युअल फंडातील युनिट, शेअर यांसारख्या साधनांमध्ये ही गुंतवणूक अडकून पडली आहे. याला कारण म्हणजे अनेकांनी आपल्या पश्चात ही बचत वा गुंतवणूक योग्य वारसाच्या हाती विनाअडथळा जाईल, याचे कोणतेही नियोजन केलेले नव्हते. यातच भर म्हणजे हे सुरळीतपणे पार पडण्यासाठी, जी प्रक्रिया आहे ती खूप गुंतागुंतीची, वेळखाऊ आणि कालबाह्य झाली आहे. जिथे वारस निर्देशित केलेले आहेत, तिथेही काही प्रमाणात अशा प्रकारे रक्कम पडून आहे, कारण खुद्द वारसांनाच या गोष्टींचा पत्ता नाही. त्यामुळे दाव्यांविना पडून राहिलेल्या रकमेत दिवसेंदिवस वाढ होत आहे.

## 'मनीलाइफ फाउंडेशन'चा अहवाल

मुंबईस्थित 'मनीलाइफ फाउंडेशन' या संस्थेने नुकताच 'Challenges in Transmissionof Assets to Nominees and Legal Heirs' हा एक अभ्यासपूर्ण अहवाल प्रकाशित केला आहे. मृत व्यक्तीच्या वारसांना हे पैसे मिळविण्यासाठी कोणकोणत्या अडचणी येतात, ते या अहवालात प्रसिद्ध पत्रकार व संस्थेच्या संस्थापक आणि विश्वस्त सुचेता दलाल यांनी सविस्तरपणे मांडले आहे. लेखाच्या सुरुवातीला जो दाव्याविना पडून राहिलेल्या दोन लाख कोटी रुपयांचा आकडा दिला आहे, त्याची वर्गवारी साधारणतः पुढीलप्रमाणे आहे...






१) बँकांमधील ठेवी ७८,२१३ कोटी रुपये:नियमानुसार रिझर्व्ह बँकेच्या 'ठेवीदार शिक्षण आणि जागृती निधी' अर्थात 'डीईएफ' (DEAF - Depositor's Education and Awareness Fund) यामध्ये मार्च २०२३ पर्यंत जमा झालेली ही रक्कम आहे. परंतु, माहितीचा अधिकार कायद्यानुसार मिळालेला तपशील पाहिला, तर प्रत्यक्षात ही रक्कम एक लाख कोटी रुपयांच्याही पुढे जाईल.

२) म्युच्युअल फंडांमध्ये विनादावा पडून राहिलेली रक्कम अंदाजे रु. ३५,००० कोटी आहे.

३) विमा कंपन्यांकडील विनादावा रक्कम अंदाजे रु. २५,००० कोटी असून, त्यात रु. १७०० कोटींची भर पडू शकते.

४) शेअर आणि लाभांशाची विनादावा रक्कम सुमारे ८३ हजार कोटी रुपये असून, ती 'गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी' अर्थातआयईपीएफ (Investor's Education and Protection Fund) यामध्ये पडून आहे.

## वारसाच्या शोधासाठी प्रयत्न हवेत!


प्रगत देशांमध्ये विनादावा पडून राहिलेल्या रकमेचा योग्य वारस कोण आहे ते शोधून काढण्यासाठी हरप्रकारे प्रयत्न केले जातात. या उलट आपल्या देशात ही रक्कम ठराविक कालावधीनंतर वर उल्लेख केलेल्या 'डीईएफ' (DEAF) किंवा 'आयईपीएफ' (IEPF) या निधीमध्ये वर्ग केली जाते. बँकांमध्ये एखादी रक्कम सलग दहा वर्षे दाव्याविना पडून राहिली, तर ती 'डीईएफ'मध्ये वर्ग करतात; तर शेअरवर जाहीर झालेला लाभांश सलग सात वर्षे दाव्याविना पडून राहिल्यास लाभांश आणि शेअर 'आयईपीएफ'मध्ये वर्ग करतात. या निधीवर सरकारचे नियंत्रण असते. हा कालावधी खूप मोठा आहे, परंतु तेवढ्या अवधीत योग्य वारसदार शोधण्यासाठी काहीच प्रयत्न केले जात नाहीत. याचा असा परिणाम होत आहे, की अशी रक्कम दरवर्षी अंदाजे १५ टक्क्यांनी वाढत आहे. मात्र,हा तपशील एकत्रितपणे मिळू शकेल अशी कोणतीही व्यवस्था नाही. अर्थात, अशा प्रकारे या निधीत वर्ग झालेल्या आपल्या खात्यातील पैसे, शेअर, लाभांश आदी परत मिळण्याची एक विशिष्ट व्यवस्था आहे. परंतु, ती इतकी क्लिष्ट आहे की सुरुवातीला उत्साहाने प्रयत्न करणारे नंतर हतबल होतात. आश्चर्य म्हणजे तंत्रज्ञानाच्या मदतीने एकीकडे कर्ज बुडवणाऱ्या कर्जदारांचा शोध हरप्रकारे घेता येत असताना याच तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर विनादावा पडून राहिलेल्या रकमेचे खरे वारसदार अथवा लाभार्थी कोण, हे शोधण्यासाठी होत नाही. ही अनास्था अगदी अलीकडेपर्यंत दिसत होती.

ही विदारक वस्तुस्थिती लक्षात घेऊन 'मनीलाइफ फाउंडेशन'ने विनादावा पडून राहिलेल्या रकमेचा तपशील गोळा करावा, ही माहिती वारसदारांना उपलब्ध व्हावी म्हणून आधुनिक तंत्रज्ञान वापरावे, दावा दाखल करण्याची पद्धती सुटसुटीत करावी यासाठी संबंधितांकडे सातत्याने पाठपुरावा केला. याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून सुचेता दलाल यांनी नामांकित वकील प्रशांत भूषण यांच्या मदतीने ऑगस्ट २०२२ मध्ये सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल केली. 'विनादावा पडून राहिलेल्या ठेवींची माहिती लोकांना एकाच ठिकाणी सहजपणे उपलब्ध व्हावी, या ठेवींचा योग्य प्रकारे शोध घेता यावा, जेणेकरून वारसदार आपले पैसे मिळवू शकतील', अशा प्रकारची विनंती या याचिकेमध्ये करण्यात आली आहे. यात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा समाविष्ट करण्यात आला आहे, तो म्हणजे, ज्यावर दावा केलेला नाही अशा मोठमोठ्या रकमा सरकारी निधीमध्ये जमा होत असताना, या रकमा योग्य वारसांना किंवा लाभार्थींना परत मिळाव्यात यासाठी कोणतेही विशेष प्रयत्न केले जात नाहीत. ही याचिका सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. या याचिकेत अतिशय आग्रहाने असे म्हटले आहे, की ज्या विनादावा रकमा वेगवेगळ्या निधींमध्ये पडून राहिल्या आहेत, त्यांचा शोध घेण्यासाठी एकच एक असे ठिकाण सध्या नाही. समजा, एखाद्या वारसाला एकाहून जास्त ठिकाणी असलेला तपशील शोधायचा असेल, तर त्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी शोध घ्यावा लागतो. हे काम कंटाळवाणे आणि वेळखाऊ आहे. अशा रकमांबद्दल संबंधितांना काही सूचना पाठवायची किंवा वापरकर्त्याला सुलभपणे शोध घेता येईल अशी कोणतीही यंत्रणा नव्हती. 'मनीलाइफ'ची याचिका दाखल होईपर्यंत तरी त्यासाठी काही विशेष प्रयत्न केले गेले नव्हते.नाही म्हणायला, 'आयईपीएफ'चे एक संकेतस्थळ विनादावा पडलेल्या शेअर व लाभांशाची माहिती बऱ्याच चांगल्या प्रकारे देते.परंतु प्रत्यक्ष दावा करण्यासाठी जी पद्धती आहे ती वापरताना अनेक तांत्रिक अडथळे येतात. याव्यतिरिक्त आता अलीकडेच रिझर्व्ह बँकेनेही 'उद्गम' नावाचे एक संकेतस्थळ सुरू केले आहे. यात बँकांमध्ये विनादावा पडून राहिलेल्या रकमांची माहिती मिळणे अपेक्षित आहे. परंतु, त्याचा 'शोध' घेण्याच्या प्रक्रियेतही अनेक अडथळे आहेत.

## दावा दाखल करण्याची प्रक्रिया

आता आपण सध्या दावा दाखल करण्यासाठी काय करावे लागते ते थोडक्यात पाहू या. दावा बँकेतील ठेवींसाठी आहे, विम्यासाठी आहे, म्युच्युअल फंडातील युनिटसाठी आहे, की शेअर आणि त्यावरील लाभांशासाठी आहे, त्यानुसार वारसाला आपल्या हक्काची पुष्टी करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे कागदपत्र द्यावे लागतात. विशेषतः बँकांमध्ये तर हे काम खूपच जिकिरीचे वाटते, त्यासाठी जी ठराविक कार्यपद्धती वापरावी लागते तिच्यातच सुसूत्रता नाही, त्यामुळे एका बँकेतील अधिकारी अमुकअमुक कागदपत्रे हवी आहेत म्हणून सांगतो, तर दुसऱ्या बँकेतील अधिकारी आणखीनच कोणती तरी कागदपत्रे मागतो. या सगळ्याचा परिणाम म्हणजे या कामी लागणारा अक्षम्य वेळ आणि कागदपत्रांची पूर्तता करण्यात येणाऱ्या अडचणी. 'मनीलाइफ'ने आपल्या अहवालात नेमके याच त्रुटींवर बोट ठेवले आहे; इतकेच नव्हे तर येणाऱ्या अडचणींची अनेक उदाहरणे देऊन त्यामुळे रक्कम योग्य वारसाच्या नावे होण्यात कसे अडथळे येत आहेत, तेही दाखवून दिले आहे.

## अडथळ्यांची शर्यत




दाव्याची पूर्तता करण्यासाठी कोणकोणती कागदपत्रे पाहिजेत, ते दावेदाराला सुरुवातीलाच सांगितले गेले पाहिजे, पण तसे न होता त्याला वारंवार चकरा माराव्या लागतात. प्रोबेट केलेले मृत्युपत्र असले, तरी अनेकदा इतरही कागदपत्रे मागितली जातात. (मृत्युपत्राची सत्यासत्यता पडताळण्यासाठी न्यायालयात विशिष्ट कायदेशीर प्रक्रिया केल्यानंतर त्या मृत्युपत्राचे सत्यापन एका

प्रमाणपत्राद्वारे केले जाते, त्यालाच प्रोबेट केलेले मृत्युपत्र असे म्हणतात.) कधी-कधी तर संबंधित अधिकारी 'सर्व दावेदारांनी प्रत्यक्ष हजर राहावे' असा आग्रह धरतात, जो पूर्ण करणे अनेक कारणांनी (जसे की दावेदार बाहेरगावी किंवा परदेशी आहे) शक्य होत नाही. बऱ्याचदा खुद्द अधिकाऱ्यांनाही दावा पूर्ण करण्याची प्रक्रिया काय याचे पुरेसे ज्ञान नसते. यामुळे दावेदारांचा गोंधळ उडतो, त्यांना नैराश्य येते.

आणखी एक मोठा अडथळा म्हणजे वित्तीय संस्था आणि त्यांच्यावर नियंत्रण ठेवणारे नियामक यांच्यातील समन्वयाचा अभाव. येथे आवर्जून उदाहरण द्यावे लागेल ते शेअर बाजार आणि म्युच्युअल फंड यांचे नियामक असलेल्या 'सेबी'चे. दावा कोणता आहे, तो दाखल करण्याची पद्धती, कोणत्या दाव्यासाठी कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत, दावा दाखल करण्यासाठीचे विहित नमुने, असे वारस म्हणून दावा दाखल करणाऱ्यांच्या हिताचे पाऊल 'सेबी'ने उचलले आणि त्याची अंमलबजावणी सुरू केली. त्या तुलनेत अशी नियमबद्ध प्रक्रिया राबविण्यात इतर नियामक खूपच मागे आहेत. अशी कोणतीही विशिष्ट प्रक्रिया नसल्याने किंवा जी प्रक्रिया आहे ती गुंतागुंतीची आणि सर्वसामान्य लोकांना त्यांच्या भाषेत नसल्याने समजण्यास अवघड आहे. अशा परिस्थितीत साहजिकच 'नको ती डोकेफोड' असा विचार दावेदारांच्या मनात येतो आणि ते दावा दाखल करण्यास पुढे येत नाहीत.

## बँकठेवींसाठी कार्यपद्धत गुंतागुंतीची

वेगवेगळ्या गुंतवणूक प्रकारात बँकांमधील ठेवींचा वाटा खूप मोठा आहे. जून, २००५ मध्ये रिझर्व्ह बँकेने सर्व बँकांना एक परिपत्रक काढून कळवले, की वारसांनी दाखल केलेला दावा सर्व बाबतीत योग्य असेल, तर त्याची पूर्तता १५ दिवसांच्या आत करण्यात यावी.

मात्र, यासाठी विहित कार्यपद्धती तयार करण्याची जबाबदारी रिझर्व्ह बँकेने इंडियन बँक्स असोसिएशनवर टाकली. असोसिएशनने त्यासाठी मूळ मार्गदर्शक तत्त्वे आखून दिली आणि बँकांनी त्यावर आधारित अशी स्वतःची कार्यपद्धती तयार केली. 'मनीलाइफ फाउंडेशन'ने एकूण २४ बँकांचा दाव्यांची पूर्तता करणाऱ्या कार्यपद्धतीचा आढावा घेतला, तेव्हा असे दिसून आले की बहुतेक बँका यासाठी एक ठराविक कार्यपद्धतीच वापरतात. मात्र, त्यातून वेगवेगळे किंवा चुकीचे अर्थ काढणे, आवश्यक नसलेल्या कागदपत्रांचीही मागणी करणे, यामुळे दाव्याची पूर्तता करण्यात दिरंगाई होते आणि गुंतागुंतही वाढते. त्यामुळे जोपर्यंत रिझर्व्ह बँक दावे विहित कालावधीत निकालात काढणे अनिवार्य करत नाही आणि बँकांनी तसे न केल्यास जबर दंडाची तरतूद करत नाही, तोपर्यंत वारसांचे हाल सुरूच राहणार.

## या सर्वांवर उपाय काय?

सद्यःस्थितीत कोणत्या अडचणी येत आहेत ते सांगून 'मनीलाइफ' स्वस्थ बसली नाही; तर या अडचणी दूर व्हाव्यात, वारसांना दावा दाखल करणे सोपे व्हावे, म्हणून कोणत्या उपाययोजना करता येतील, तेही त्यांनी आपल्या अहवालात सांगितले आहे. त्यातील एक प्रमुख म्हणजे 'एक खिडकी' संकल्पना. गेल्या काही वर्षांत ग्राहकांच्या सोयीसाठी ही संकल्पना अनेक ठिकाणी राबवली गेली आहे. मृत व्यक्तीचे पैसे जिथे कुठे पडून राहिले आहेत, ती सगळी माहिती एका केंद्रीभूत संकेतस्थळावर उपलब्ध झाली, तर त्या व्यक्तीच्या वारसांना ही माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होईल आणि प्रत्येक गोष्टीसाठी वेगळा शोध घ्यायची गरज भासणार नाही. याचा फायदा केवळ दावेदारांनाच नव्हे, तर संबंधित अधिकाऱ्यांनाही मोठ्या प्रमाणावर होईल, त्यांचाही वेळ वाचेल.

### शेअरबाबत 'सेबी'चे पाऊल

'सेबी'ने शेअर आणि तत्सम सिक्युरिटीज यांच्या सुलभ हस्तांतरासाठी अलीकडेच एक सुटसुटीत नियमावली आखून दिली असून, ती अनिवार्यही केली आहे. कोणत्या प्रकारच्या दाव्यासाठी कोणती कागदपत्रे घ्यावीत, याचे स्पष्ट निर्देशही 'सेबी'ने सर्व रजिस्ट्रार आणि ट्रान्स्फर एजंटांना दिले आहेत. शिवाय एखाद्या गुंतवणूकदाराचा मृत्यू झाल्यास त्याची माहिती ग्राहकांच्या माहितीची (KYC - Know your customer) नोंद करणाऱ्या संस्थांमार्फत एकत्रितपणे गोळा केली जाईल, अशी व्यवस्थाही 'सेबी'ने केली आहे. त्यामुळे मृत्यू प्रमाणपत्र अथवा इतर कागदपत्रे वारंवार द्यायची आवश्यकता नाही. थोडक्यात, वारस किंवा दावेदार असो किंवा दाव्याची पूर्तता करणारा अधिकारी, यांच्यात कोणतीही संदिग्धता राहणार नाही, अशी अपेक्षा करता येईल.

वेगवेगळ्या सहकारी संस्थांसाठी निबंधक (रजिस्ट्रार) असतात. या संस्थांची माहिती तिथे साठवली जाते. त्याच धर्तीवर प्रत्येक महापालिका, पालिका, ग्रामपंचायत पातळीवर 'मृत्यू निबंधक' (Registrar of Deaths) स्थापन करावेत, अशीही महत्त्वाची सूचना 'मनीलाइफ'च्या अहवालात करण्यात आली आहे. सध्या वारसांना दावा दाखल करताना मृत्यूच्या प्रमाणपत्राची प्रत अनेक ठिकाणी द्यावी लागते. अशा निबंधकांमुळे ही प्रत सहज उपलब्ध होऊन, जी संपत्ती आहे ती वारसाच्या नावाने वर्ग करणे सोपे जाईल. केंद्रीय निबंधकांकडे सर्व तपशील असावा, जेणेकरून वेगवेगळ्या वित्तीय संस्था, विमा कंपन्या आदींना मृत व्यक्तीची सर्व माहिती एकाच ठिकाणी पडताळून पाहता येईल.

सध्याचे तंत्रज्ञान वापरून अनेक उपाययोजना करणे शक्य आहे. अशा काही योजना 'मनीलाइफ'च्या अहवालात सुचविण्यात आल्या आहेत. त्या अंमलात आणण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न होणे गरजेचे आहे, तसे ते व्हावेत म्हणून 'मनीलाइफ'ने हा अहवाल सर्व नियामकांना पाठवला आहे.

**(अक्षय नाईक हे 'मनीलाइफ फाउंडेशन'मध्ये प्रकल्प संचालक (८८७९५९९७०३) असून, अभय दातार हे तज्ज्ञ समुपदेशक (९८१९४७३८३) म्हणून कार्यरत आहेत.)**